# -जाहिरात-

## मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर

जा.क्र. आस्था./२०२६/२३५५ दि. ०२/०४/२०२६.

मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या आस्थापनेवर **'स्वयंपाकी'** या पदासाठी **०४ उमेदवारांची निवड यादी आणि ०१ उमेदवाराची प्रतिक्षा यादी** तयार करण्यासाठी, जाहिरात प्रसिध्दिच्या दिनांकास पात्रता निकष आणि आवश्यक अटींची पूर्तता करणा-या, इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. निवड यादी व प्रतिक्षा यादी ही प्रसिध्दीच्या दिनांकापासून २ वर्षासाठीच वैध राहील. सदर पदाची वेतन मॅट्रीक्स एस-३: ₹ १६,६०० - ५२,४००/- अधिक नियमानुसार देय भत्ते अशी आहे.

**अ) <u>पात्रता</u> :-**

१) वयोमर्यादा :-

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| अराखीव (खुला) | १८ वर्ष | ३८ वर्ष |
| अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती किंवा इतर मागास प्रवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाने निर्दिष्ट केलेल्या विशेष मागासवर्गीय उमेदवारांसाठी | १८ वर्ष | ४३ वर्ष |
| विहीत मार्गाने अर्ज करणा-या न्यायालयीन / शासकीय कर्मचा-यांसाठी | १८ वर्ष | लागू नाही |

२) उमेदवार कमीत कमी चौथी इयत्ता उत्तीर्ण असावा.

३) उमेदवाराकडे स्वयंपाकाचे पूरेसे ज्ञान व त्यासंबंधी अनुभव असणे आवश्यक आहे.

४) उमेदवारास मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

**ब) <u>पात्र उमेदवारीकरीताच्या अटी</u> :-**

१) उमेदवार करार करण्यास सक्षम असावा.

२) उमेदवारास नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरविण्यात आले नसावे किंवा कोणत्याही न्यायालय / एम.पी.एस.सी / यु.पी.एस.सी किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याव्दारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकले नसावे किंवा अपात्र ठरविले नसावे.

३) उमेदवारास फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविले नसावे किंवा त्याच्या/तिच्याविरुध्द फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

**क) अर्ज सादर करण्याची प्रक्रिया / कालावधी :-**

१) उक्त नमुद पात्रता निकष आणि अटी पुर्ण करणा-या इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. **१८/०४/२०२६ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत** किंवा आधी पोहचेल या बेताने त्यांचे अर्ज **(जाहिरातीसोबत परिशिष्ट 'अ' नमुन्यात),** खालील खंड **'इ'** येथे नमुद दस्तऐवजांसह खालील पत्यावर फक्त स्पीड पोस्ट (Speed post) किंवा रजिस्टर्ड पोस्टाद्वारे (R.P.A.D) पाठवावेत. अर्जासोबत 'Registrar High Court Bench at Nagpur' यांच्या नावे काढलेला **₹ ३००/- (रूपये तीनशे मात्र)** चा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) किंवा पोस्टल ऑर्डर जोडावा. सदर शुल्क ना परतावा आहे. अर्ज पाठविताना पाकिटावर **'स्वयंपाकी पदासाठी अर्ज'** असे ठळक अक्षरात लिहावे.

**पत्ता - प्रबंधक (प्रशासन),**
**मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ,**
**सिव्हील लाईन्स,**
**नागपूर - ४४० ००१.**

२) स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर्ड पोस्टाव्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमातुन किंवा वरील नमुद केलेल्या दिनांकानंतर मिळाल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) जाहिरातीला अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार व उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार, अल्पसुची (Shortlisting) करण्याचे सर्व अधिकार प्रशासन, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

**ड) परिक्षेचे स्वरूपः-**

१) आलेल्या अर्जांची छाननी केल्यानंतर अल्पसुची प्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| **अ.क्र** | **मूल्यांकन पध्दती** | **गुण** |
|---|---|---|
| १ | स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा-<br>(उत्तीर्ण गुण किमान ५०% म्हणजे १५ गुण) | ३० |
| २ | शारीरिक क्षमता चाचणी | १० |
| ३ | तोंडी मुलाखत | १० |
| | **निवड प्रक्रियेचे एकुण गुण** | **५०** |

**<u>सूचना</u>:-** स्वयंपाकाच्या प्रात्यक्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास उमेदवाराचा उर्वरित परीक्षेसाठी विचार केला जाणार नाही.

२) परिक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) ई-मेल द्वारे पाठविण्यात येतील. परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे.

३) अल्पसुचीत पात्र उमेदवारांसाठी स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी तसेच तोंडी मुलाखतीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाचे संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. यासाठी उमेदवारांनी संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी.

**इ) <u>उमेदवारांनी अर्जासोबत खालील नमुद दाखल्यांच्या /प्रमाणपत्रांच्या स्वयं:प्रमाणित (Self-attested) केलेल्या छायांकित प्रति सादर कराव्यात</u>:**

१) जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / एस.एस.सी चे बोर्ड प्रमाणपत्र). (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority/Board Certificate of SSC)

२) शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र (चौथी, दहावी, बारावी किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यताप्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला, इत्यादी). गुणपत्रिका टक्केवारी ऐवजी ग्रेडच्या स्वरूपात असल्यास विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेली संबंधीत शाळेच्या गुणपत्रकाची स्वयं:प्रमाणित प्रत.

३) स्वयंपाकाच्या कामासंदर्भात पुर्वानुभवाचा दाखला.

४) सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी)

५) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

६) अर्जदाराने त्याला बनवता येणा-या पाककृतींची यादी सोबत जोडावी.

७) सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

८) उमेदवाराच्या नावात बदल झालेला असल्यास नावाच्या बदलाबाबतचे शासकीय राजपत्राची, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाहप्रमाणपत्राची प्रत सादर करावी.

९) दोन पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत पाठवावे.

१०) उच्च न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज

**उमेदवारांनी अर्जासोबत खालील मूळ दाखले / कागदपत्रे जोडावीत:-**

११) लहान कुटुंबाबाबत स्वयं घोषणापत्र. (जाहीरातीसोबत नमुना 'अ' नुसार)

१२) जाहिरात प्रसिध्दीनंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी (सदर व्यक्ती नातेवाईक नसावेत) दिलेले चारीत्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र, त्यांचा हुद्दा, पत्ता व फोन नंबर सह (जाहीरातीसोबत नमुना 'ब' नुसार)

१३) उमेदवार न्यायालयीन / शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजूरी घेतल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१४) ₹ ३००/- (रूपये तीनशे मात्र) चा 'Registrar High Court Bench at Nagpur' यांच्या नावे काढलेला डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) किंवा पोस्टल ऑर्डर.

**फ) <u>अर्ज भरण्यासंबंधी उमेदवारांना असेही सूचित करण्यात येते की:-</u>**

१) अर्ज विहित नमुन्यातच असावा (जाहीरातीसोबत परिशिष्ट “अ” नमुन्यात)

२) अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

३) उमेदवाराने उपयोगात असलेलाच ई-मेल आयडी (e-mail ID), मोबाईल नंबर अर्जात नमूद करावा.

४) उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्जात अचूक शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने त्याची/तिची पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमुद करावी

१. ४ थी

२. एस.एस.सी (S.S.C.)

३. एच. एस. सी. (H.S.C.) किंवा तत्सम डिप्लोमा कोणत्याही मान्यताप्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेला.

५) **काही शाळांच्या गुणपत्रिका टक्केवारीऐवजी ग्रेडच्या स्वरूपात दिल्या जातात. या प्रकरणात, उमेदवारांनी ऑफलाईन अर्ज भरण्यापूर्वी विषयनिहाय मिळालेले गुण, एकुण गुण आणि टक्केवारी असलेले गुणपत्रक संबंधित शाळेकडून मिळवावे आणी ते गुण विहीत रकान्यात दिलेल्या सूचनेनुसार भरावे. सदर गुणपत्रकाची स्वयं:प्रमाणित प्रत्र अर्जासोबत पाठवावी. वरील सुचनेचे पालन न केल्यास अर्ज नाकारला जाईल.**

६) उमेदवाराने जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता आणि निकष पूर्ण केले असतील तरच अर्ज स्विकारला जाईल.

**ग) <u>उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना</u>:-**

१) कोणत्याही वैध कारणामुळे भरती प्रकिया रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रशासन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२) अपुर्ण / चुकीची माहिति असलेला अर्ज नाकारला जाईल. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिति खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. अथवा त्यानंतर नियुक्ती झाल्यास त्याला /तिला पदावरून काढुन टाकण्यात येईल.

३) अल्पसूचीत समाविष्ट उमेदवार जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजुन त्याला स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती / नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास त्याचे / तिचे नाव निवडप्रक्रीयेतुन वगळण्यात येईल.

४) केवळ अर्ज दाखल केला यावरुन उमेदवार चाचणी परीक्षा, मुलाखत किंवा नेमणूकीसाठी पात्र ठरणार नाही.

५) मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी त्यांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात. तसेच या कार्यालयास मान्य होईल असे स्वत:चे फोटो प्रमाणपत्र (Photo ID) जसे मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना इत्यादीपैकी एखादा पुरावा आणावा.

६) पात्र उमेदवारांना (नेमलेल्या तारखांना) स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीसाठी स्व:खर्चाने हजर राहावे लागेल.

७) कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते. असा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://bombayhighcourt.gov.in किंवा https://bombayhighcourt.nic.in) प्रसिध्द केला जाईल.

८) उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतीची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस उमेदवार स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीसाठी अनुपस्थित राहिल्यास, उच्च न्यायालय प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार / दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

९) उमेदवाराने दिलेला कोणताही तपशील खोटा किंवा चुकीचा असल्याचे आढळल्यास, उमेदवाराला निवड प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि नियुक्त झाल्यास त्याला काढून टाकण्यात येईल. कोणतीही वस्तुस्थिती दडवल्यास अर्ज नाकारला जाईल.

१०) उमेदवाराने स्वयंपाकाची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच शारीरिक क्षमता चाचणी परीक्षेमध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे, तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्यांने तोंडी मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर तोंडी मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल. फक्त पात्र उमेदवारांचीच तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

११) उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करण्याऱ्या अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना भेटाण्याचा किंवा त्यांच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१२) उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास शुल्कासह त्याचा/तिचा शेवटचा अर्ज विचारात घेतला जाईल, याची नोंद घ्यावी.

१३) निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल.

१४) निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरुवातीला दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जाऊ शकतात.

१५) या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

स्वाक्षरी/-
प्रबंधक (प्रशासन)
मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ,
नागपूर

ठिकाण:- नागपूर
दिनांक:-०२/०४/२०२६

---

'परिशिष्ट अ'

# मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर

## "स्वयंपाकी" पदाकरिता अर्ज

प्रति,
**प्रबंधक (प्रशासन),**
मुंबई उच्च न्यायालय,
नागपूर खंडपीठ,
नागपूर ४४० ००१.

नुकताच काढलेला पासपोर्ट साईज फोटो

**महोदय,**

मी निम्नस्वाक्षरीत, याद्वारे अर्ज सादर करतो / करते की, मी आपल्या कार्यालयात **"स्वयंपाकी"** या पदावर काम करण्यास इच्छुक असून माझी तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव (श्री/श्रीमती/कुमारी)<br>(मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेत) | : | ______________________<br>नाव वडील / पतीचे नाव आडनाव<br>______________________<br>First name Middle name Surname |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता<br>(पिनकोड सह) | : | |
| ३ | कायमस्वरूपी संपूर्ण पत्ता<br>(पिनकोड सह) | : | |
| ४ | राष्ट्रीयत्व | : | |
| ५ | लिंग | : | |
| ६ | जन्मदिनांक | : | दिनांक _____ महिना _____ वर्ष ______ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक | : | |
| ८ | ई-मेल ID | : | |
| ९ | धर्म | : | |
| १० | जात व प्रवर्ग | | |
| ११ | जातीचे प्रमाणपत्र आहे काय ? (मागासवर्गीयांसाठी). | : | होय / नाही |
| १२ | उमेदवार विवाहीत आहे काय ? | : | होय / नाही |
| १३ | हयात असलेल्या मुलांची संख्या | : | |
| १४ | २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या | : | |
| १५ | महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे काय ? | : | होय / नाही |
| १६ | अर्जदार शासकीय / न्यायालयीन कर्मचारी आहे काय? असल्यास न्यायालयाचे / शासकीय कार्यालयाचे नाव व नेमणुकीचा दिनांक | : | होय / नाही<br>................................................................................... |
| १७ | शासकीय / न्यायालयीन सेवेत असल्यास कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | : | होय / नाही |
| १८ | डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) किंवा पोस्टल ऑर्डर | : | बँकेचे नाव - |
| | | | क्रमांक - |
| | | | दिनांक - |
| | | | शुल्क - |

१९) **शैक्षणिक अर्हता** :

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | परीक्षा मंडळाचे नाव | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

२०) **स्वयंपाकी कामाचा अनुभव** :

| अ. क्र | अनुभव (संबंधित काम केलेल्या ठिकाणाचे / कार्यालयाचे नाव आणि दुरध्वनी क्रमांक) | कालावधी | | एकूण (वर्ष, महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

२१) भाषांचे ज्ञान :

२२) अ) उमेदवाराविरुध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे काय? होय / नाही
(असल्यास माहिती जोडावी)

ब) उमेदवारास फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले आहे काय? होय / नाही
(असल्यास माहिती जोडावी)

क) उमेदवारावर शिस्तभंगविषयक चौकशी प्रलंबित आहे काय? होय / नाही
(असल्यास माहिती जोडावी)

| | | |
|---|---|---|
| २३) | कोणत्याही न्यायालय / एम. पी. एस. सी / यु. पी. एस. सी किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमस्वरूपी काढुन टाकले आहे काय? (असल्यास माहिती जोडावी) | होय / नाही |

## : प्रतिज्ञापत्र :

मी .................................................................................................................................. वय .............. वर्ष, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो / करते की, वरील नमूद केलेली माहिती अचुक तसेच जाणीवपूर्वक दिली असून परिपूर्ण सत्य आहे. वरील माहिती खोटी व चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि निवड / नेमणूक झाल्यास माझी सेवा कोणतीही नोटीस न देता संपूष्ट करण्यात येईल., याची मला जाणीव आहे.

दिनांक -

ठिकाण - **उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१) ..........................................................................

२) ..........................................................................

३) ..........................................................................

४) ..........................................................................

५) ..........................................................................

६) ..........................................................................

७) ..........................................................................

८) ..........................................................................

९) ..........................................................................

१०) ..........................................................................

११) ..........................................................................

# नमुना 'अ' (‘Form ‘A’)

## <u>घोषणापत्र</u>

मी, श्री/श्रीमती/कु ...............................................................................................

श्री ....................................................................................... यांचा मुलगा / मुलगी / पत्नी, वय ............................... वर्षे, राहणार ............................................... याव्दारे पुढील प्रमाणे जाहीर करतो / करते की,

१. मी स्वंयपाकी या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२. आज रोजी मला .................. (संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ................ आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा)

३. ह्यात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

४. मी असेही जाहीर करतो / करते की, माझ्या विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा माझ्या विरुध्द फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझ्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही झालेली नाही.

५. ह्या जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व सूचना व अटी मला मान्य आहे.

दिनांक : / /

ठिकाण : ................................ उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

**<u>टिप</u>** - अविवाहीत उमेदवारांनी लागू नाही असे नमूद करून स्वत:ची स्वाक्षरी करावी.

# नमुना 'ब' ('Form 'B')

## <u>चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ..................................................................................

हे गाव ............................ तालुका ................................., जिल्हा ........................................, येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील .................... वर्षापासून ओळखतो / ओळखते, त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते / त्या माझे नातेवाईक नाहीत.

करिता सदरील वर्तणूक / चारित्र्य प्रमाणपत्र स्वयंपाकी पदाकरिता देण्यात येत आहे.

**ठिकाण :-** .........................

**दिनांक :-** .........................

**प्रमाणपत्र देणाऱ्याचे नाव, हुद्दा व सही**

**सही:-**........................................................

**नाव.:-**........................................................

**हुद्दा:-**......................................................

**पत्ता:-**........................................................

.......................................................................

.......................................................................

**भ्रमणध्वनी क्रमांक :-** ..............................